RNI No. MAHAUL03008/13/1/2012-TC

# POWER OF KNOWLEDGE

**An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal**

**Editor**
**Dr. Sadashiv H. Sarkate**

**• Mailing Address •**
**Dr. Sadashiv H. Sarkate**
**Editor : POWER OF KNOWLEDGE**
**Head of Dept. Marathi**
Art's & Science College, Shivajinagar, Gadhi, Tq. Georai Dist. Beed-431 143 (M.S.)
Cell. No. 9420029115 / 7875827115
Email : powerofknowledge3@gmail.com /
shsarkate@gmail.com

**Price : Rs. 300/-**
**Annual Subscription: Rs. 1000/-**

RNI No.MAHAUL03008/13/1/2012-TC

ISSN 2320-4494

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal

**Volume I, Issue III**
***Oct. to Dec. 2021***

Editorial Officer
**Kranti Publication**
Georai Dist.Beed
Beed -431 127
Contact : 7875827115
**E-mail :** Sarkatelata@gmail.com

**Published By :**
Mrs. Lata Sadashiv Sarkate

**Price :** Rs. 300/-

**Advisory :-**

**Hon. Dr. Sudhir Gavhane**
Ex.Vice Chancller Y.C.M.U. Nasik
& Professor of Mass Communication
& Jornalism Dr.B.A.M.U. Aurangabad

**Hon. Dr. V. B. Bhise**
Ex-Professor, Dept. of Economics
Dr.B.A.M.U. Aurangabad

**Hon. Dr. Madan Shivaji**
Ex-Management Council Member
Dr.B.A.M.U. Aurangabad

**Hon. Dr. Bhagwat Katare**
Ex. Director, BCUD
Dr.B.A.M.U. Aurangabad

**Hon. Dr. Sanjay Nawale**
Head of Dept. Hindi
Dr.B.A.M.U.Aurangbad

**Hon. Dr. Paralikar Kanchan**
Principal, Mahila College, Georai

**Hon. Dr. Ashok Mohekar**
Ex-Magement Council Member
Dean, Faculty of Science,
Dr.B.A.M.U. Aurangabad

**EDITOR**

***Dr.Sadashiv Haribhau Sarkate***
Senate Member, Ex-Chairman-BOS in Marathi, Dr.B.A.M.U.Aurangabad
Associate Professor & Head, Dept. of Marathi, JBSPM's
Arts & Science College, Shivajinagar, Gadhi Tq. Georai Dist. Beed.

**EDITOR BOARD**

**Dr. Mala Nurilmala**
Dept.of Aquatic Product Technology
Faculty of Fisheries and Marine Sciences
Bogor Agricultural University, Indonsia

**Dr. Bharat Handibag**
Ex-Dean, Faculty of Arts
Dr.B.A.M.U.Aurangabad

**Dr. Dhere R.M.**
Dept.of Zoology
Swa.Sawarkar Mahavidayala, Beed

**Dr. Vasant Biradar**
Princial, Mahatma Phule
Mahavidyalaya,Ahmedpur,Dist.Latur

**Dr.Sudhakar Shendge**
Professor of Hindi
Dr.B.A.M.U.Aurangbad

**Dr.D.P. Takale**
Professor & Head
Dept. of Economics
L.B.S.College, Partur Dist.Jalna

**Dr.Ganesh Adgaonkar**
Kalika Devi ,Collage
Shirur Kasar Dist.Beed

**Dr.Aparna Ashtaputre**
Dept. of Psychology,
Dr.B.A.M.U.Aurangbad

**Dr. Kadam Mangal S.**
PG. Dept.of Zoology
Yeshwant Mahavidayala, Nanded

**Dr. Rajesh Karpe**
Management Council Member
Dr.B.A.M.U.Aurangabad

**Dr. Taher H. Pathan**
Aligad Muslim university, Aligad (U.P.)

**Dr.S.D.Talekar**
Professor, Dept. of Commerce
L.B.S.College, Partnr Dist Jalna

**Dr.S.R.Takale**
Principal, Sant Sawatamali, College,
Phulambri Dist. Aurangabad'

**Dr.Bharat Khandare**
Principal, Swami Vivekanand College,
Mantha. Dist. Jalna

**Dr.Vishwas Kadam**
Principal, JBSPM's Arts & Science
College, Gadhi Tq.Georai, Dist. Beed

**Dr.Fulchand Salampure**
Management Council Member
**Dr.B.A.M.U.Aurangabad**

**REFERECS**

**Dr.Shahaji Gaikwad**
Ex-Chairman, BOS in English
Dr.B.A.M.U.Aurangabad

**Dr.Vishwas Patil**
Radha Nagari College,Radha
Nagari, Dist. Kolhapur

**Dr. Dilip Khairnar**
Professor, Sociology
Deogiri College, Aurangabad

**Dr. Santos Chavan**
Shivchhatrapati College,
Pachod, Dist. Aurangbad

**Dr. Shivaji Yadhav**
Shivchhatrapati College,
Pachod, Dist. Aurangbad

**Dr. Laxmikant Shinde**
Assit.Professor
JES College, Jalna

**MANGING EDITORS**

**Mr. Ramesh Ringne**
**Prof. Bapu Ghokshe**
**Mr. Shivaji Kakade**
**Dr. Shakur Shaikh Husain**

**Mr. Vinod Kirdak**
**Dr. Datta Tangalwad**
**Mr. Kalandar Pathan**
**Dr. Suhas Morale**
**Dr. Baliram Katare**

**Assit.Prof.Mohan Kalkute**
**Dr. Adgaonkar Ganesh**
**Dr. Santosh Chavan**
**Dr. Rajkumar Yallawad**

| | | | |
|---|---|---|---|
| 21 | निसर्ग पुजक आदिवासी | प्रा. कविता वळवी | 116 |
| 22 | लोकसाहित्यातील विनोद | डॉ. नवनाथ गोरे | 119 |
| 23 | जागतिकीकरण आणि मराठी सण उत्सव | प्राचार्य डॉ. आशा मुंडे | 122 |
| 24 | 'आदिवासी साहित्यातील वारली जमातीचे चित्रण' | प्रा. डॉ. माहेश्वरी गावित | 128 |
| 25 | आधुनिकता और वैज्ञानिकता : स्थिति और गति | प्रा. डॉ. बी. आर. नळे | 136 |
| 26 | केदारनाथ सिंह के कविताओं में चित्रित विविध समस्याएँ | डॉ. भगवान पी. कांबळे | 141 |
| 27 | स्त्रीवादाचे स्वरूप आणि संकल्पना | प्रा.रमेश रिंगणे | 146 |
| 28 | हिन्दी साहित्य में महिला सबलीकरण | प्रा.कडेकर सी.जी. | 150 |
| 29 | 'कितने पाकिस्तान उपन्यास' में ऐतिहासिक एवं समकालीन | प्रा.डॉ. शेख मोहसीन रशीद | 153 |
| 30 | बांगला देशातील राजकीय अस्थिरता | डॉ.जयराम ढवळे | 158 |
| 31 | जयप्रकाश नारायण आणि समाजवाद | प्रा. डॉ. रजनी बोबडे | 163 |
| 32 | विठ्ठल रामजी शिंदे यांचे सामाजिक योगदान | श्रीनाथ नामदेवराव शेळकीकर | 169 |
| 33 | नेतृत्वाचा आदर्श 'यशवंतराव चव्हाण' | डॉ.भुजंग विठ्ठलराव पाटील | 174 |
| 34 | भारतीय राज्यघटना व समता | प्रा.पटवारी दयानंद शंकरअप्पा | 179 |
| 35 | शेवटचा निजाम मीर उस्मानअलीचे धोरण | प्रा.डॉ.सुनिल रामचंद्र पुरी, | 184 |
| 36 | हैदराबाद स्वातंत्र्य संग्रामात आर्य समाजाचे योगदान : विशेष संदर्भ - कंधार तालुका | प्रा.बंडे वसंत निवृत्ती | 194 |
| 37 | रासायनिक घटकाच अतिवापर म्हणजे महाराष्ट्रातील शेती व्यवसायाचा विनाश ! | प्रा.दोरवे श्रीमंत रघुनाथ | 198 |
| 38 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शिक्षण विषयक विचारांची उपयुक्तता | प्रा.सिद्धार्थ मुंगे | 206 |
| 39 | आर्थिक मंदीत रिझर्व्ह बँकेची भूमिका | डॉ.राजेश गंगाधरराव उंबरकर | 209 |

# बांगला देशातील राजकीय अस्थिरता

**डॉ.जयराम ढवळे**
कला व विज्ञान महाविद्यालय, शिवाजीनगर, गढी
ता.गेवराई जि.बीड

बांगला देशात सद्या जे काही होत आहे. ते बघता असे म्हणावेसे वाटते की , तेथिल परिस्थिती ही चिंताजनक असल्याचेच जाणवते आहे. पंतप्रधान शेख हसीना यांनी जर वेळीच तेथील धर्मांध शक्तींना वेळीच रोखले नाही, तर पुढील काळात मोठया संघर्षाला सामोरे जावे लागेल. शेख हसीना या धर्मनिरपेक्ष तत्वज्ञानाचा आणि लोकशाहीचा आदर करणा-या आहेत. या उलट , बांगलादेशातील जमात -इ-बांगलादेश ही संघटना शेख हसीना यांना नेस्तनाबुत करण्याचे नानाविध मार्ग अनुसरताना दिसते. बांगलादेशामध्ये सध्या जे काही सुरु आहे. ते थोडेसे समजुन घेणे आवश्यक आहे.

**संशोधन पध्दत :-**

ऐतिहासिक व विश्लेषणात्मक पध्दत अवलंबुन संशोधन करणे. दुय्यम स्त्रोतात प्रकाशित संदर्भ ग्रंथ , विविध्द वार्षिकांक , मासिक व प्रकाशित झालेले वर्तमानपत्रातील विविध लेख यांचा समावेश करण्यात आला आहे.

**संशोधनाची उदीष्टये :-**

१) राज्यशास्त्रातील अभ्यास करणा-यांना याविषयी माहिती मिळणे.

२) आंतरराष्टीय संबंधाचा अभ्यास करणा-या विदयार्थ्यांना व संशोधन करणा-या संशोधकाला बांगलादेशाची सदयास्थितीची माहिती व्हावी म्हणुन .

**बांगला देशाची निर्मिती :-**

१४ ऑगस्ट १९४७ रोजी भारतातुन पाकिस्तान स्वतंत्र झाला. पाकिस्तानच्या निर्मित्तीने जगात असे एक राज्य निर्माण झाले की, त्याचे भौगोलिक दष्टया दोन भाग होते. एक पाश्चिम आणि दुसरा पुर्व पाकिस्तान . एकाच देशाच्या या दोन भागांमध्ये चौदाशे किलोमीटरचे अंतर आहे की, आपण जेंव्हा पश्चिम पाकिस्तानात जातो, तेंव्हा मला विदेशात गेल्यासारखे वाटते व आपणाला मिळणारी वागणूकही फारशी चांगली नसते.

१९७० साली पाकिस्तानात झालेल्या सार्वत्रिक निवडणूकीचा निकाल अवामी लीगला प्रौत्साहित करणारा ठरला. अवामी लीगला बहुमत मिळाले व शेख मुजिबुर रेहमान आता पंतप्रधान होणार, असे राजकीय वातावरण तयार झाले. पण राजकारणावर आपलाच वरचष्मा असला पाहिजे असे वाटणाऱ्या पंजाबी आणि सिंधी नेत्यांनी शेख मुजिबूर रहेमान पंतप्रधान होणार नाहीत. अशी व्युहरचना केली आणि त्यामुळे पुर्व पाकिस्तानात असंतोषाची मोठी लाट निर्माण झाली. त्यावेळी पाकिस्तानात असंतोषाची मोठी लाट निर्माण झाली. त्यावेळी पाकिस्तानात

पीपल्स पार्टीच्या नेतृत्वाखाली झुल्फिकार अली भूट्टो यांचे सरकार होते. आपणास बहुमत असूनही सत्तेपासून वंचित ठेवण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. जेंव्हा हे मुजिबूर रहेमान यांना जाणवले, तेंव्हा आपली शक्ती दाखविण्यासाठी त्यांनी ढाका येथे सभा आयोजित केली आणि बंगाली आस्मितेचे दर्शन घडविले. या सभेला कित्येक लाख लोक उपस्थित होते. ज्यांच्या मनात आपला स्वतंत्र देश असावा, अशी भावना होती, ते लोक आपल्या भावना घोषणाद्वारे व्यक्त करित होते. यामुळे शेख मुजिबूर रहेमान यांचे बळ वाढले, पुढे लगेचच २३ मार्च १९७१ रोजी त्यांनी पुन्हा जाहिर सभा घेतली आणि बांगला देशच्या निर्मित्तीची जाहीर घोषणा केली. २३ मार्च हा बांगला देशाचा प्रजासत्ताक दिन आहे, त्याच दिवशी आपण स्वतंत्र होत असल्याची घोषणा शेख मुजिबूर रहेमान यांच्या नेतृत्वाखाली बंगालच्या जनतेने केली.

**बांगलाच्या निर्मितीनंतरचा संघर्ष :-**

पाकिस्तानने आपले लष्कर प्रमुख लेफ्टनन ननरल ऐ.के. नियासी यांच्या नेतृत्वाखाली पश्चिम पाकिस्तानातील लष्कर मोठ्या प्रमाणावर तैनात केले व इथूनच दवऱ्या अर्थाने संघर्षास सुरुवात झाली. लष्कराने सर्वप्रथम शेख मुजिबूर रहेमान यांना अटक केली आणि पश्चिम पाकिस्तनातील तुरुंगात ठेवले. पण दुसऱ्या फळीतील नेत्यांनी आणि कार्यकत्यांनी लष्कराशी संघर्ष करण्याचा निर्णय घेतला. हंगामी सरकार स्थापन केले व त्याचे कार्यालय कोलकाता येथे ठ़ेवले. व त्याचे नेतृत्व जनरल एम.ए. उस्मानी यांचेकडे सोपविले. त्यांनी कोलकाता येथे राहून आपल्या कार्यकत्यांना मार्गदर्शन केले. प्रश्न होता तो क्रुर लष्कराविरोधत लढण्याचा, जनता नि:शस्त्र व लष्कर सशस्त्र होत. लेफ्टनन जनरल ए.के. नियाझी यांनी जनतेवर अत्याचार केले. या काळात अत्याचाराला घाबरलेले किमान ७० लाख निर्वासित भारतामध्ये आले. त्यांना सांभाळण्याचा संरक्षण देण्याचा मोठा पेच भारत सरकार पुढे उभा राहिला. यावेळी तत्कालीन पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी कणखर भूमीका घेत, बांगला देशाच्या स्वातंत्र्य लढयाला पाठिबां देण्याचा निर्णय घेतला. बंगाली नागरिकांनी पाकिस्तानच्या लष्कराविरोधात जी लढाई सुरु केली, त्या लढाईला भारतीय लष्कराने सर्वपोपरी मदत केली आणि कालांतराने भारतीय लष्कर बंगाली जनतेला मदत करण्यासाठी तेथे पाठविण्यात आले. व भारतीय लष्कराच्या पाकिस्तानी लष्कराशी थेट सामना झाला. पश्चिम पाकिस्तान आणि पुर्व पाकिस्तान हे दोन्ही एकेकाळी भारताचेच भाग होते. धर्माच्या आधारावर भारताची फाळणी झाली अणि भारत, पुर्व पाकिस्तान आणि पाश्चिम पाकिस्तान असे दोन देश तयार झाले. अपेक्षा अशी होती की, धर्म पंजाबी आणि बंगाली संस्कृतीला एकत्र ठेवली. पण तसे झाले नाही. भाषा आणि संस्कृतिने धर्मावर मात केली. बंगाली भाषा आणि बंगाली संस्कृती प्रिय असलेल्या जनतेचा बांगलादेश उदयाला आला. स्वतंत्र राष्ट्राला त्याचे असे राष्ट्रगीत लागते. राष्ट्रगीताची निवड करताना बांगला देशच्या विचारवंतानी आणि नेत्यांनी रवींद्रनाथ टागोर यांचे आमार सोनार बांगला हे गीत निवडले आणि रवींद्रनाथ टागोर यांचा गौरव केला. राष्ट्रकवी म्हणून काझी नझरुल इस्लाम यांची त्यांनी निवड केली.

जगभरातून पाकिस्तानवर दडपण येऊ लागले. शेख मुजिबूर रेहमान यांची तुरुंगातून सुटका करावी म्हणून शेख मुजिबूर रेहमान हे स्वातंत्र्ययोध्दे आहेत आणि म्हणून त्यांची सुटका झाली. पाहिजे. अशी मागणी जगभरातून होऊ लागताच पाकिस्ताननेही नमने घेतले आणि त्यामुळे ८ जानेवारी १९७२ साली शेख मुजिबूर रेहमान यांची तुरुंगातून मुक्तता झाली व ते बांगलादेश ला परतले. त्यांनी बांगला देशाची सुत्रे आपल्या हातात घेतली. १२ मार्च १९७२ रोजी भारतीय सैन्य माघारी आले. १९७२ मध्ये बांगला देशला युनोचे सदस्यत्व मिळाले. यानंतर १९७४ साली पाकिस्ताननेही बांगला देशाच्या स्वातंत्र्याला मान्यता दिली आणि बंगाली भाषेचे नवे राष्ट्र उदयाला आले. बांगला देशात २००८ साली सार्वात्रीक निवडणूका झाल्या. त्यात अवामी लीगच्या शेख हसीना पंतप्रधान झाल्या. त्यांनी २५ मार्च २०१० रोजी एक समिती स्थापन केली. या नायालयीन समितीत त्यांनी फझल कबीर, झहीर अहमद व महंमद निझामुल हक यांचा समावेश केला. या समितीच्या तिन्ही सदस्यांनी ही जबाबदारी स्वीकारली व चौकशीला सुरुवात केली. त्यांनी जमात-ए - इस्लामी बांगला देश या संघटनेच्या तीन नेत्यांची आंतरराष्ट्रीय कायद्याला अनुसरुन चौकशी केली. या चौकशीत हे तिन्ही नेते गुन्हेगार असल्याचे त्यांनी सिध्द केले. यामध्ये मोतीऊर रेहमान (७३ वर्षे ) हे खालिदा झिया यांच्या सरकारमध्ये मंत्री होते. दुसरे आरोपी दिलावर हुसेन सईदी (७३ वर्षे), तिसरे आरोपी अब्दुल कलम आझाद हे जमानचे पुढारी २०१० साली सुरु झालेली चौकशी ५ फेब्रूवारी २०१३ साली संपली. खटला निकालात लागला. या तिघांनाही चौकशी समितीने दोषी जाहीर केले व फाशीची शिक्षा सुनावली त्यातूनच आजचा हिसांचार वाढला आहे.

शेख हसीना यांच्यापुढे आज धर्मांध शक्तींचे एक आव्हानच उभे राहिले आहे. धर्मांध शक्ती संख्येने अगदीच कमी आहेत. कोणत्याही परिस्थितीत बांगलादेशामध्ये आपली पाळेमुळे रुजवाचीच या जिद्दीने आज धर्मांध शक्ती तेथे काम करतांना दिसत आहेत. त्यांना फुस आणि मदत ही मिळते, ती अफगाणिस्थानातील अल-कायदा सारख्या संघटना, इसिससारख्या संघटना ज्यांच्याजवळ आर्थिक बळही मोठे आहे. जेंव्हा जेंव्हा विद्वानांचे खून करण्यात आले. तेंव्हा तेंव्हा तेथील जनतेने धर्मांध शक्तीच्या विरोधात मोठी निदर्शने केली आहेत. ही निदर्शने करताना मरण पावलेला विद्वान कोणत्या धर्माचा होता, याचा विचार केलेला नाही, ही या प्रकरणातील जमेची बाजू म्हणता येईल. इतका हिंसाचार होत असताना देखील शेख हसींना अजिबात डगमगलेल्या नाहित. धर्मांध शक्तीचे आव्हान स्वीकारण्यासाठी आपण समर्थ आहोत, अशी भूमीका त्यांनी घेतली आहे. हीसुध्दा महत्वाची बाब आहे. सद्यातरही त्यांचे लष्कर, त्यांचे पोलिस त्यांच्या निमंत्रणात आहेत.

**मुल्यमापन :-**

बांगला देशात जे काही होत आहे त्याचा विचार करता, बांगला देशाची भौगोलिक रचना पाहता या देशाशी आमच्या सीमा लागून आहेत. एका बाजूला तर पश्चिम बंगाल आहे. आणि दुसऱ्या बाजूने आसाम त्रिपूरा ही राज्ये आहेत. म्हणजे बांगलादेशमध्ये जे काही होईल. त्याचे पडसाद सर्वप्रथम भारतातच उभरतील उदाहरणार्थ जेंव्हा जेंव्हा बांगला देशात हिंसक घटना घडतात तेंव्हा तेंव्हा जिवाला घाबरुन जे लोक बांगलादेश

सोडतात, ते आश्रयासाठी भारतात येतात. जाण्यासाठी त्यांना दुसरा देशच नाही. अशाप्रकारे आलेल्या निर्वासितांची संख्या आता आसामात प्रमाणापेक्षा जास्त वाढली असून, ती डोकेदूखी ठरली आहे. बांगला देशात पुरोगामी विचारांचे, धर्मनिरपेक्ष तत्वज्ञान माणणारे सरकार असणे भारताच्या दृष्टीने केंव्हाही चांगले. सध्या बांगलादेशत अवामी लीगचे सरकार आहे. अवामी लीगची भावना आजवर तरी नेहमीच भारताविषयी कृतज्ञता व्यक्त करणारी राहीली आहे. भारतात ज्या घाडामोडी पडतात, त्याचे पडसाद शेजारच्या देशात उमटतात. भारत जेवढा धर्मनिरपेक्ष लोकशाहीवादी व समाजवादी असेल तेवढा बांगलादेशसुध्दा तसा होऊ शकतो. ह्याचा विचार आंतरराष्ट्रीय पातळीवर होणे गरजेचे आहे.

**संदर्भ :-**

१. Indo Bangladesh Relations- P. Sukumar Nair A.P.H. Publishing Corpration New Delhi - २०१०

२. भारत बांगलादेश संबंध- डॉ. संजय कुमार पांडे, डॉ. मोनु कुमार - मोहिनी पब्लिकेशन्स नवी दिल्ली. १ जाने २०१६.

३. भारत बांगला देश संबंध - लेफ्ट. जन. वाय.एम. बामी- व्ही. आय जे बुक्स प्रा.लि. २०१०

४. बांगला देश स्वतंत्रता और भारत- पाक संबंध- डॉ. कृष्णदेव झारी, पराग प्रकाशन जाने २०१०.